**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व सलंग्न संस्थेतील सुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि. ०१/०७/२०१५ ते ३१/०१/२०१६ या कालावधीची महागाई भत्ता थकबाकी देण्याबाबत.**

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.**
**अर्थप्रशासन विभाग**

**वाचा : १) या विभागाचे परिपत्रक क्र.अप्रवि/मभवा/निमवा/२०१५-१६/२३०३, दि.१५/०२/२०१६.**
**२) शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक : मभवा-१११५/प्र.क्र.४२/ सेवा-९, दि.२२/०२/ २०१६.**
**३) शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक : निमवा-२०१५/प्र.क्र.१६/ सेवा-४, दि.२८/०२/२०१६.**

**आदेश**

**क्र.अप्रवि/मभवा/निमवा/२०१६-१७/ ११४** **दिनांकः ४ /०५/२०१६**

उपरोक्त **परिपत्रक क्र १.** नुसार १५ फेब्रुवारी, २०१६ पासुन **मुळ वेतन अधिक ग्रेड वेतन / निवृत्ती वेतन/कूटूंब निवृत्ती वेतन** यांच्या एकूण रकमेवर दिनांक १ फेब्रुवारी, २०१६ पासुन ६ % दराने महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे म्हणजेच सध्याच्या ११३ % महागाई भत्या ऐवजी वरीलप्रमाणे वेतनाच्या/निवृत्ती वेतनाच्या/कूटूंब निवृत्ती वेतनाच्या ११९% महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न अनुदानित संस्थातील कर्मचा-यांना व निवृत्ती वेतन धारकांना दिनांक १ फेब्रुवारी, २०१६ पासुन उपरोक्त महागाई भत्याची वाढ लागु करण्यात आलेली आहे. **आता उपरोक्त शासन निर्णयान्वये माहे जुलै ,२०१५ ते जानेवारी, २०१६ या कालावधीची महागाई भत्ता वाढीची थकबाकी रक्कम रोखीने देण्यात यावी.**

सदरहू महागाई भत्याची थकबाकी **माहे मे-२०१६ देय जून-२०१६ चे नियमित वेतन, निवृत्ती वेतन देयकात रोखीने अदा करावी. किंवा त्यापुढील नियमित मासिक वेतन देयकात समावेश करावा** मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पूरवणी देयके पारित केली जाणार नाहीत.

महागाई भत्ता वाढीच्या **थकबाकी** अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन २०१६-१७ चे मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

भाकृअप योजनातंर्गत २०१६-१७ करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वियन अधिका-यांनी प्रस्तुत महागाई भता **थकबाकी** विचारात घेवून त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी. व्दितीय सहामाही करीता अनुदानाची मागणी यापुर्वी केलेली असल्यास महागाई भत्याच्या थकबाकी तरतुदीसाठी स्वतंत्र वाढीव मागणीचा प्रस्ताव संबंधित कार्यान्वयन अधिका-यांनी भाकृअपस त्वरीत सादर करावा.

Vspawal.
**नियंत्रक**
**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,**
**अकोला**

**प्रति:१)** नियंत्रण अधिकारी(सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख(सर्व).

2)प्राचार्य ________________

3)अधिदान व लेखा अधिकारी, डॉ.पंदेकृवि, अकोला/नागपुर.

यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना **१ जुलै ,२०१५ ते ३१ जानेवारी, २०१६** या कालावधीची महागाई भत्ता थकबाकी रक्कम रोखीने माहे **मे-२०१६ देय जून-२०१६** चे नियमित मासिक निवृत्ती वेतन देयकात प्रदान करणेत यावी. महागाई भत्ता अदा करण्यासाठी निवृत्ती वेतन अथवा वेतनाचे स्वतंत्र पुरवणी देयके आपण पारित करु नये.

स्वा/-
**नियंत्रक**